**पंतप्रधान आणि युनायटेड किंग्डमच्या पंतप्रधानांचा भारतीय आणि यूके व्यावसायिक धुरीणांसोबत संवाद (24 जुलै 2025)**

24 जुलै 2025

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी आणि युनायटेड किंग्डमचे पंतप्रधान आदरणीय सर कीर स्टार्मर यांनी आज भारत आणि यूकेच्या उद्योग धुरिणांसोबत संवाद साधला. ऐतिहासिक भारत-यूके सर्वसमावेशक वित्तीय आणि व्यापार करार [CETA] वर स्वाक्षरी पार पडल्यानंतर हा संवाद पार पडला. आरोग्य, औषधनिर्माण, रत्ने आणि दागिने, ऑटोमोबाईल्स, ऊर्जा, उत्पादन, दूरसंचार, तंत्रज्ञान, आयटी, लॉजिस्टिक्स, वस्त्रोद्योग आणि वित्तीय सेवा क्षेत्रातील उभय बाजूंचे उद्योग धुरीण या बैठकीसाठी उपस्थित होते. उभय देशांच्या रोजगार निर्मिती आणि समावेशक आर्थिक विकासात हे क्षेत्र महत्त्वपूर्ण योगदान प्रदान करतात.

2. अलीकडील काळात द्विपक्षीय व्यापार आणि गुंतवणूक संबंधांमध्ये विस्तार झाल्याचे उभय नेत्यांनी अधोरेखित केले. उद्योग धुरिणांशी संवाद साधताना उभय नेत्यांनी व्यापार, गुंतवणूक आणि नाविन्यपूर्ण भागीदारी अधिक सखोल करण्यासाठी CETA मधून येणाऱ्या संधींचा सर्वोत्तम फायदा घेण्यास प्रोत्साहित केले. द्विपक्षीय सहकार्य विस्तार करुन आर्थिक विकासाला चालना देण्याच्या सामायिक वचनबद्धतेची पुष्टी करताना, उभय नेत्यांनी नमूद केले की नवीन करारामुळे दोन्ही अर्थव्यवस्थांमध्ये आणि जागतिक आर्थिक परिदृश्यात व्यावसायिक आवेगाला चालना मिळेल. CETA चे मूर्त फायदे अधोरेखित करताना, उभय नेत्यांनी दोन्ही राष्ट्रांमधील प्रमुख उत्पादने आणि नवोपक्रमांच्या प्रभावी श्रेणींच्या प्रदर्शनाला भेट दिली. प्रदर्शनात रत्ने आणि दागिने, अभियांत्रिकी वस्तू, दर्जेदार ग्राहक उत्पादने आणि प्रगत तांत्रिक उपायांचा समावेश होता.

3. भारत-ब्रिटनच्या व्यावसायिक नेत्यांनी ऐतिहासिक व्यापार कराराचे कौतुक केले आणि आशावाद व्यक्त केला की यामुळे व्यापक धोरणात्मक भागीदारीत एक नवीन युग सुरू होईल आणि केवळ व्यापार आणि अर्थव्यवस्थेतच नव्हे तर उदयोन्मुख तंत्रज्ञान, शिक्षण, नवोन्मेष, संशोधन आणि आरोग्य क्षेत्रातही सहकार्य वाढेल.

4. उभय नेत्यांनी नवीन कराराच्या क्षमतेचा वापर करण्यासाठी आणि आगामी वर्षांसाठी आर्थिक सहकार्याचे बंध अधिक दृढ करण्यासाठी लहान आणि मोठ्या व्यवसायांना पाठिंबा देण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेची पुष्टी केली.

**लंडन**

24 जुलै 2025